# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-बातमी/२०२१** **दिनांक:- १८ नोव्हेंबर, २०२१**

**जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून आलेले व्यवस्थापन प्रतिनिधी यांच्यामधून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या एका जागेसाठी ९ डिसेंबर, २०२१ रोजी निवडणूक होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.**

निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव प्रा.आर.एल.शिंदे यांनी आज दि. १८ नोव्हेंबर रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला असून अधिसभा सदस्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळ (www.nmu.ac.in) आणि नोटीसबोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे. २८ नोव्हेंबर पर्यंत निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज भरता येईल. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेपासून उमेदवारी अर्जांची छानननी होऊन वैध-अवैध अर्जांची यादी जाहीर केली जाईल. १ डिसेबर रोजी दुपारी १२:३० वाजेपर्यंत कुलगुरुंकडे आक्षेप दाखल करता येतील. ३ डिसेंबर रोजी कुलगुरु अपिलावर निर्णय देतील. ५ डिसेंबर रोजी दुपारी १२:३० पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. त्यानंतर त्याच दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर होणार आहे. ९ डिसेंबर रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत दुपारी ३:३० ते ४:३० या वेळेत मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतदानानंतर मतमोजणी होऊन निकाल जाहीर होईल.

---

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकात जळगाव, धुळे व नंदुरबार या तिन्ही जिल्हयात उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करिता